ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!

# छात्र प्रबोधन

सौर माघ शके १९४७ । वर्ष २६ अंक ५।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष ३४ अंक ७)
वार्षिक वर्गणी ₹ ४००। मूल्य ₹ ३०। पृष्ठे २८

माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या, दऱ्याखोऱ्यांतील शिळा...
रत्नजडित अभंग, ओवी अमृताची सखी
चारी वर्णातुनी फिरे, सरस्वतीची पालखी...





# डोळे उघडून बघा गड्यांनो

डोळे उघडून बघा गड्यांनो झापड लावू नका
जे दिसते ते असेच का हे उलगडण्याला शिका ।। ध्रु. ।।

भवतालीचे विश्व कोणत्या सूत्राने चाले
कोण बोलतो राजा आणिक कुठले दळ हाले
प्रारंभी जे अद्‌भूत वाटे गहन, भीतिदायी
त्या विश्वाचा स्वभाव कळता भय उरले नाही
या दुनियेचे मर्म न कळता जगणे केवळ फुका ।। १ ।।

वाहून गेलेल्या पाण्याचा ढग बनतो तो कसा
बीज पेरता कसे उगवते, पाऊस येई कसा
चारा चरूनी शेण होतसे, शेणाचे खत पिका
पीक पेरता फिरूनी चारा, चक्र कसे हे शिका
जीवचक्र हे फिरे निरंतर इतुके विसरू नका ।। २ ।।

अणुरेणूंची अगाध दुनिया दृष्टीच्या पार
सूक्ष्म जीव अदृष्य किरणही भवती फिरणार
या सर्वांच्या आरपार जी मुक्तपणे विहरे
बुद्धि मानवी स्थिरचर सारे विश्व वेढुनी उरे
विज्ञानाची दृष्टि वापरा, स्पर्धेमध्ये टिका ।। ३ ।।

– प्रा. रामभाऊ डिंबळे

या पद्याची चाल
ऐका आणि पद्य म्हणा!

**पद्याचा भावार्थ :** आपल्या भवतालच्या सृष्टीतील विविध घटना, सजीवांचा जीवनक्रम, त्यांचा परस्परांशी असलेला संबंध या सगळ्याकडे 'उघड्या' डोळ्यांनी पाहण्याचे आवाहन प्रस्तुत पद्यात कवीने केले आहे. सतत 'का', 'कसे' हे प्रश्न तुम्हाला पडले, तर त्यांची उत्तरे विज्ञानाच्या साहाय्याने उलगडायला तुम्ही शिकाल असे कवी म्हणतो.

'या विश्वाचा कारभार चालवणारी कोणतीतरी शक्ती आहे. तिचा कोप झाला तर अनर्थ ओढवेल' ही भीती माणसाच्या मनात असते; पण आता विज्ञानाने या विश्वाची निर्मिती, घडणाऱ्या प्रत्येक घटनेमागचा कार्यकारणभाव आपल्याला समजू शकतो. पाणी-ढग-पाऊस-शेती किंवा प्राण्यांनी खाल्लेला चारा-शेण-शेणाचं खत-खतापासून-पीक-पिकापासून पुन्हा चारा या सदैव फिरणाऱ्या चक्राचे उदाहरण देऊन कवी जीवनचक्रांचा सोप्या शब्दांत परिचय करून देतो.

दृष्टीला न दिसणारे अणू-रेणू, सूक्ष्म जीव, अदृश्य किरणं या सर्वांचा वेध घेणारी माणसाची प्रतिभा, बुद्धी ही अनंत आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन वापरून तुम्ही सतत स्पर्धेत टिका-प्रगती करत राहा, असा संदेश पद्याच्या शेवटी दिला आहे.

**छात्र प्रबोधन**
ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठीचे
कृतिशीलता जोपासणारे मासिक!

**निव्वळ मासिक नव्हे!**
**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!**

मासिक। दिवाळी अंक। प्रकाशने।
कल्पक स्पर्धा। साहित्य मेळावे-संमेलने।

ॐ
इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन

**सौर माघ, शके १९४७। वर्ष २६ अंक ५**
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ४०३ वा अंक, वर्ष ३४ अंक ७)
प्रकाशन दिनांक – सौर १२ माघ, शके १९४७/१ फेब्रुवारी २०२६

## अंतरंग

२. पद्य... **डोळे उघडून बघा गड्यांनो** – प्रा. रामभाऊ डिंबळे
* पद्य चालीचे ध्वनिमुद्रण

४. **संवाद** – शिल्पा कुलकर्णी

५. एकांकिका... **मिले सूर मेरा तुम्हारा (संगीतिका)** – सुहासिनी देशपांडे
* पाहा – स्वा. सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त गीताचे सादरीकरण

१२. कविता... **ग्रंथ** – प्रा. बी. एन. चौधरी
* वाचा – चिंटू, लेखक – प्रणव पंडित

१३. माहितीपर... **फुलपाखरांमधील संरक्षणासाठीचे अनुकूलन!** – ओंकार जोशी
* पाहा – फुलपाखरांच्या जीवनशैलीची चित्रफीत

१५. प्रासंगिक ... **'मराठी' आज्जीची गोष्ट...** – अक्षय वाटवे

१८. वाचलेच पाहिजे असे काही ... **अभ्यासनाट्य** – क्षितिजा आगाशे

२०. माहितीपर ... **ध्वनी** – प्रितेश लोले

२१. तंत्रज्ञान... **नवा मेस्सी!** – डॉ. मेघश्री दळवी

२४. प्रेरणादायी ... **'कुमार' साहित्य संमेलन २०२६!** – मकरंद जोशी
* पाहा – कुमार साहित्य संमेलन भोर येथील चित्रफीत

२७. **जानेवारी-फेब्रुवारीतील विशेष वार्ता**

**याशिवाय :** श्रद्धांजली (१२), शाळांसाठी वर्गणीत विशेष सवलत (१९), कविता पूर्ण करा... (२३), जोडीकार्य स्पर्धा -२, कल्पक स्पर्धा निर्णय, स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे अभिनंदन, प्रतिसादी वाचकवीर व्हा! प्रश्न (२६)

**पानांखालील ओळी :** मराठी गौरवदिनपर **माहितीपर :** पारंपरिक नृत्यप्रकार

**मुखपृष्ठ :** या महिन्यातील दिनविशेषांवर आधारित मुखपृष्ठ रेखाटले आहे.

**अवश्य वाचा... पाहा... ऐका...** * **या लिंक्स QR कोडला जोडल्या आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा. त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करा.**

**संपर्क पत्ता : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030**
☎ (०२०) २४२०७१७४/१७५ **संकेतस्थळ :** www.chhatraprabodhan.org
**इ-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया
**मानद संपादक**
शैलजा देशमुख
**संपादक मंडळ**
वाच. कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन
स्वाती ताडफळे
मल्हार अरणकल्ले
**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी
**मुखपृष्ठ**
राहुल धामणे
**आतील चित्रे**
चित्रांजली

**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
**वार्षिक :** ₹ ४०० (दिवाळी अंकासह),
+ स्पीडपोस्ट/कुरिअरने अंक पाठविण्यासाठी अतिरिक्त खर्च ₹ ३००
**या अंकाची किंमत :** ₹ ३०

**इंग्रजी त्रैमासिक अंक**
**मूळ वर्गणी :** ₹ ४००
**सवलतीत वर्गणी :** ₹ २००
(दिवाळी अंकासह ६ अंक वितरण खर्चासह)

**पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी व मासिकाच्या ऑनलाइन सभासद नोंदणीसाठी**
**jpprakashane.org**
या संकेतस्थळाला भेट द्या!!

देव वाणीतील गीता, माय मराठीत आली ।
माझ्या मराठी मनास, स्नान कैवल्याचे घाली ।।

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. किशोर पंडीत, चेंबूर, मुंबई ➢ डॉ. संजय गद्रे, धुळे ➢ श्री. वामन पारखी, पुणे
➢ श्री. अनिरुद्ध शहापूरकर, पुणे ➢ वाचस्पती सौ. वैशाली पाटील-देवरे, शिरपूर, जि. धुळे

## संवाद

प्रिय प्रबोधकांनो,

कसे आहात? स्नेह संमेलन, क्रीडा महोत्सव, बक्षीस समारंभ, सहल असे कितीतरी उपक्रम गेल्या महिन्या-दीड महिन्यात तुमच्या शाळेत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले असतील. तुम्ही प्रबोधकांनी देखील या उपक्रमांमध्ये तुमचा सक्रिय सहभाग नोंदवला असेल.

गेल्या महिन्यात दि. १० जानेवारी रोजी छात्र प्रबोधन, पुणे नगर वाचन मंदिर, भोर एज्युकेशन सोसायटी या तीन संस्थांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय 'कुमार साहित्य संमेलन' राजा रघुनाथराव विद्यालय, भोर येथे उत्साहात पार पडले. या कुमार साहित्य संमेलनात भोर परिसरातील नऊ शाळांमधील इ. ८वी, इ. ९वीच्या सुमारे ५०० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. (तपशील पान क्र. २४, २७ वर वाचा व पाहा.)

शब्दांशी मैत्री, वाचनाची गोडी, साहित्याची अभिरुची वाढवणारं असं हे कुमार साहित्य संमेलन कुमारांचा लेखन-अभिवाचन सादरीकरणाचा आत्मविश्वास वाढवायला मदत करते, चालना देते. चालू महिन्यात देखील **दि. २७ फेब्रुवारी रोजी 'छात्र प्रबोधन' आणि 'विद्यावर्धिनी विद्यालय', अहमदपूर, जि. लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने कुमारांसाठी एकदिवसीय कुमार साहित्य संमेलनाचं आयोजन केलं आहे.** निमित्त आहे २७ फेब्रुवारी रोजी असणाऱ्या मराठी भाषा गौरवदिनाचे! तुम्हाला देखील असं संमेलन तुमच्या शाळेत योजायचं असेल, तर तुमच्या शिक्षकांशी बोला व त्यांना छात्र प्रबोधनशी संपर्क करायला सांगा.

मराठी भाषा गौरवदिनानिमित्त (कविवर्य कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी) २७ फेब्रुवारी तसेच २८ फेब्रुवारी रोजी असणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून तुम्ही तुमच्या शाळेत कोणते कल्पक उपक्रम योजणार आहात? त्या-त्या विषयाची जाण, समज वाढवण्यासाठी हे दिनविशेष 'निमित्त' असतात. त्यातून त्या-त्या विषयांचे उपक्रम नियमित राबवण्यासाठी चालना मिळते. साहित्याविषयी विशेष रुची असणाऱ्या गटाने एकत्र येऊन, शिक्षकांशी बोलून 'कुमार साहित्य मंडळ' स्थापन करावं. त्या मंडळाने साहित्यावरील प्रश्नमंजुषा, 'लेखक-संवाद' योजावे. वाचकवीर स्पर्धा, पुस्तक परिचय लेखन स्पर्धा, मराठी भाषेचा वापर जाणीवपूर्वक वाढवण्यासाठी काही संकल्प करावे आणि ते पूर्ण होण्यासाठी कृति-कार्यक्रम योजावे. आपापल्या परिसरातील आयोजित केलेल्या पुस्तक प्रदर्शनांना भेट द्यावी, ग्रंथालयांना भेट द्यावी. असं बरंच काही करू शकाल, यासाठी काही मदत लागली तर छात्र प्रबोधनशी अवश्य संपर्क करा.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान विषयक आवड असणाऱ्या गटाने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजवणारे उपक्रम शिक्षकांशी चर्चा करून योजावे. विज्ञान प्रकल्प-प्रदर्शने, शास्त्रज्ञांशी संवाद साधून शोधामागच्या कहाण्या जाणून घेणं, प्रश्नमंजुषेचं आयोजन करणं, दैनंदिन वापरातल्या गोष्टींमागचं विज्ञान-तंत्रज्ञान जाणून घेणं इ. गोष्टी तुम्ही करू शकाल.

यंदाच्या २८ फेब्रुवारी २०२६ रोजी आकाश निरीक्षकांना दुर्मीळ दिसणारी 'ग्रहांची परेड' पाहता येईल. पृथ्वीच्या दृष्टिकोनातून (perspective) सहा ग्रह आकाशाच्या एकाच बाजूला एकत्र येणार आहेत. यामध्ये बुध, शुक्र, गुरु, शनि, युरेनस, नेपच्यून यांचा समावेश आहे. ही खगोलीय घटना नक्की पाहा. (त्यातील युरेनस, नेपच्यून वगळता चार ग्रह साध्या डोळ्यांनीही तुम्ही पाहू शकाल.)

तेव्हा फेब्रुवारी महिन्यातील दोन्ही दिनविशेष तुम्ही कशा पद्धतीने साजरे केले, ते आम्हाला मेलद्वारे कळवायला विसरू नका! **इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शालांत परिक्षेत कॉपी न करता स्वतःच्या हिंमतीवर सुयश मिळवण्यासाठी छात्र प्रबोधनतर्फे मनःपूर्वक शुभेच्छा!!**

**तुमची,**
**शिल्पाताई**

**जाणून घ्या नृत्यप्रकार : भरतनाट्यम (तामिळनाडू)** - भ (भाव), र (राग), त (ताल) आणि नाट्यम् (नृत्य) या शब्दांवरून तयार झालेलं हे नृत्य, कलात्मक तसेच आध्यात्मिक अभिव्यक्तीसाठी ओळखले जाते.

वार्षिक देणगीदार - ➢ सौ. किरण मुसळे, सांगली ➢ श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे ➢ श्री. श्रीपाद कुलकर्णी, पुणे ➢ सौ. स्नेहा भंडारे-जोशी, पुणे ➢ डॉ. प्रतीक रवींद्र सेठिया, पुणे ➢ श्री. नागेश साने, पुणे

**पात्रे –**

आजोबा (हे वास्तविक एकांकिकेत निवेदक म्हणून आहेत),

आजी, सई (नात), सनी (नातू) आई, बाबा

# मिले सूर मेरा तुम्हारा (संगीतिका)

एकांकिका

– सुहासिनी देशपांडे

**मकर संक्रांत ते रथसप्तमी (माघ सप्तमी) या काळात तिळगुळाची देवाणघेवाण होते. हा काळ सूर्यासंबंधी व्रत करण्याचा काळ-धुंधुरमासाचा काळ! काय असेल निसर्गाची/ऋतुचक्राची त्यामागची योजना? जाणून घेऊ या सोबतच्या या एकांकिकेतून...**

**निवेदक :** *आजीनं मांडला पसारा फार*
*लेकुरवाळी भाजी, तिळाची भाकरी,*
*वांग्याचं भरीत, नि खिचडी मुगाची,*
*लोण्याचा गोळा, नि तुपाची धार,*
*आजी, गं आजी, झाला पसारा फार.*

(मोबाइलवर बोलत प्रथम सई प्रवेशते, दुसरीकडून सनी हातात फोनवर बोलतोय. पाठोपाठ आई पण तिच्या व्हाटसअ‍ॅपवर विनोद वाचून हसतेय. बाबासुद्धा ऑफिसच्या कुठल्याशा एन्व्हॉईसवर चर्चा करत, व्यग्रपणे येरझारा घालत बोलतायत. आजी प्रत्येकाच्या पाठी 'जेवायला चला' म्हणून सांगायचा प्रयत्न करते; पण प्रत्येकजण आपापल्या कॉलमध्ये मग्न, उलटपक्षी तिलाच गप्प करण्याचा प्रयत्न करताहेत. आजी जाम चिडचिड करते.)

**आजी :** *आहे ते मिटवा, अन् नाही ते भेटवा!*
*जवळच्याकडे फिरवा पाठ,*
*नि दूरच्याला घाला गळामिठी दाट!*
*आहे काय नि नाही काय ..!!*

**आजी :** (मनाशीच)
*भोगीचा दिवस आज, आहे धुंधुरमास*
*भाकरी-भरताचा बेत, केलाय मी खास!*
*पण थांबणार कोण, नि खाणार कोण?*
*घरातले म्हातारे आम्ही, इन-मीन दोन...*

**निवेदक :** *आजीबाई, नाही आम्हाला कळत*
*केवढा हा उंधीयो, नि भाकरींची चळत*
*कोणासाठी गं रांधतेस*
*नि वाट बघत बसतेस?*

**आजी :** (स्वतःशीच – डबे भरता भरत)
हा शेजारच्या जोशी आजींना,
हा देईन तायडीच्या डब्यात घालून;
पण, देईल का कोणी माझ्या तायूला नेऊन?
पोरांना विचारू का, आत्याकडे डबा
पोहोचवा म्हणून?
अन् हो, हे तायूच्या सुनेला
म्हणजे माझ्या नातसुनेला!

**आजोबा :** *आणि हे आमच्या लाडक्या नातवालाही–*



*म्हणजे लाडोबा गौरवला...*
*खातील गरम गरम खिचडी नि पापड*
*अन् गौरवला तर भरीत म्हणजे,*
*मेजवानीच फक्कड!*

**आजी** : (उत्साहाने) अजून तिळाच्या वड्या कापायच्या आहेत, उदया संक्रांतीची सुगडं सजवायची आहेत. फार नाही, तरी पाच सुवासिनींना वाणं द्यायची आहेत.

**आजोबा :** अहो, किती वर्ष हे परिश्रम? आता आपला वानप्रस्थाश्रम, आपण तर बुवा 'हरी-हरी' करणार!
हो! पण तसं तिळगूळाला 'नाही'-नाही म्हणणार... (मोठ्याने हसतात.)

**आजी** : अहो, आपण नाही केलं तर पुढच्या पिढ्यांना कसं कळणार?
यांच्या भिशी नि *किटी पार्ट्या*
थोड्याच कामी येणार?
म्हणे आपण बुवा 'हरी हरी' करणार!
इकडे गुळाच्या पोळीवर ताव कोण मारणार..!
आहे काय नि नाही काय?(डबे भरत.. स्वगत)
*उदास आहे माझी शेजी*
*मुलं तिची दूर देशी*
*खाईल चवीनं दोन घास*
*आज सुरू धुंधुरमास*

**सई नि आजीचा संवाद :** (जॉनी जॉनीच्या चालीवर)
*ग्रॅनी ग्रॅनी येस बेटा?*
*सिंगिंग समथिंग?*

**आजी :** *नो बेटा!*

**सई :** *पिंचिंग समथिंग??*

**आजी :** *नो बेटा (डोळे पुसते)*

**सई :** *लूक इन्टू माय आईज.. हा हा हा!*
(आजीचे डोळे पुसत हसते)
*गॉट इट* आज्जी, तू इतकं सारं केलंस; पण जेवायला कोणीच नाही म्हणून *सॅड* झालीस ना? ही मी थांबले! आजची माझी पिझ्झा *पार्टी कॅन्सल*! आता तरी *हॅपी* ना?

**आजी :** *खुश गं पोरी खुश!*
*कसली पिझ्झा पार्टी मेली!*
*ऐकत नाही का तू राम-प्रहरी?*

**सई :** (रामदेवबाबांची '*बटरफ्लाय*'ची, प्राणायामाची नक्कल करत)
*कोकाकोला माने टॉयलेट क्लीनर*
*पिझ्झा-बर्गर माने बरबादीका घर*
(दोघी हातात हात घेत हसतात.)

**आजी :** *आता खुश झाले खरी,*
*सई उठते की रामप्रहरी!*
*वाटले, रामदेवबाबाला पोर ऐकणार कशी?*
*सई तर आमची 'सूर्यवंशी'...*

**सई :** सूर्यवंशी? म्हणजे गं काय आजी?
'सूर्यवंशम्' तर *फिल्म* अमिताभची?
(आजी डोक्याला हात लावते.)

**आजी :** सूर्यवंशी म्हणजे सूर्य उगवला तरी उठत नाही अशी! भाषेची वाट आणि संस्कारांची तर ऐशी की तैशी!!

**सई नि आजी** (मिळून) **:** आहे काय नि नाही काय!


**सई :** (मस्का मारत) बरं बरं आज्जी! धुंधुरमास म्हणजे गं काय?

**आजी :** (खुश होत) *आता कशी! ऐक अशी!*
*ठेव तो मोबाइल बाजूला जराशी!!*
(आजी आणि सई दोघी *फ्रीज* होतात. निवेदकाचा आवाज.)

**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी**
**jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा**
**किंवा**
**वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा!**
**आणि घरपोच अंक मिळवा.**

**जाणून घ्या नृत्यप्रकार : कथ्थक (उत्तर प्रदेश) -** 'कथा' या संस्कृत शब्दावरून आला आहे, ज्याचा अर्थ कथा सांगणे असा आहे.

वार्षिक देणगीदार - ➢ सौ. स्मिता चावरे, ऐरोली, नवी मुंबई ➢ श्री. अमोल लिमये, पुणे ➢ डॉ. जयेश रहाळकर, पुणे ➢ कु. राधा श्रावण हर्डीकर, पुणे ➢ श्री. विनय गडीकर, पुणे ➢ श्री. केदार वसंत जोशी, पुणे



# ग्रंथ

ग्रंथ देती, ज्ञान सारे, ग्रंथ देती मान रे,
ग्रंथ आणा, ग्रंथ वाचा, ग्रंथची द्या दान रे!

शब्द शब्द जुळताना, भाव भाषा जुळती,
माणसाला अक्षरांचे, भेद सारे कळती.
ज्ञानवृद्धी साधण्याला, हा उपाय छान रे,
ग्रंथ आणा, ग्रंथ वाचा, ग्रंथची द्या दान रे!

द्वेष कुंठा अज्ञानाला, ग्रंथ करती दूर रे,
सार सांगी ते जगाला, मोह माया झूठ रे.
तिमिर दूर सारण्याला, ग्रंथ हे वरदान रे,
ग्रंथ आणा, ग्रंथ वाचा, ग्रंथची द्या दान रे!

गुढ-रम्य-कूट कोडी, वाचता प्रज्ञा खुले,
गोष्ट कविता न् गाणी, ऐकता मन झुले.
संस्कृती संस्कार ग्रंथ, रंजनाची खाण रे,
ग्रंथ आणा, ग्रंथ वाचा, ग्रंथची द्या दान रे!

**वाचा**
लेख : चिंटू
लेखक : प्रणव पंडित

**– प्रा. बी. एन. चौधरी**
देवरूप, नेताजी मार्ग,
धरणगाव, जि. जळगाव 425105

**जाणून घ्या नृत्यप्रकार : ओडिसी (ओडिशा)** – कोणार्क आणि पुरीच्या जगन्नाथ मंदिरात याचा उगम झाला. त्रिभंग मुद्रा म्हणजे शरीराच्या तीन ठिकाणी वक्रता (कंबर, मान, गुडघे) असलेली मुद्रा हे मुख्य वैशिष्ट्य आहे.

वार्षिक देणगीदार - ➢ गेझनर इंडिया प्रा. लि., पुणे ➢ सौ. संगिता कानडे, पुणे ➢ डॉ.अश्विनी जोशी, पुणे ➢ श्री. अमित गद्रे, पुणे ➢ असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे ➢ श्री. हृषीकेश भागवत, बंगळुरू, कर्नाटक

# फुलपाखरांमधील संरक्षणासाठीचे अनुकूलन!

माहितीपर

– ओंकार जोशी

रंगीबेरंगी पंखांचे, स्वच्छंदी, फुलांभोवती फिरणारे फुलपाखरू पाहताना त्याच्या सौंदर्यासोबतच त्याची नाजूकताही प्रतीत होते. निसर्गात अशा सौंदर्यवान फुलपाखराला फिरताना अत्यंत सतर्क राहावं लागतं. पक्षी, सरडे, पाली यांसारखे अनेक प्राणी फुलपाखरांसाठी दबा धरून बसलेले असतात.

फुलपाखरांकडे स्वतःचं संरक्षण करण्यासाठी मोठे दात, टोकेरी नखं, किंवा विषारी डंख असं काहीही नसतं. म्हणजेच फुलपाखरांना शिकाऱ्यावर थेट पलटवार करता येत नाही. तरीही फुलपाखरे टिकून आहेत, याचं कारण फुलपाखरांनी विकसित केलेल्या 'संरक्षणयुक्त्या' आणि विशिष्ट 'अनुकूलने!' या लेखात आपण फुलपाखरांच्या अशाच काही रंजक आणि सुज्ञ बचाव पद्धतींचा परिचय करून घेणार आहोत.

ही अनुकूलने फुलपाखराच्या अंडी वगळता सर्व अवस्थांमध्ये दिसून येतात. फुलपाखरांची अंडी अतिशय लहान, सूक्ष्म आणि बहुतेक वेळा लपलेली असल्यामुळे त्यांना फारशी संरक्षणाची गरज भासत नाही. शिवाय फारच थोडे प्राणी फुलपाखरांची अंडी अन्न म्हणून खातात.

## छद्मवेष/छद्मावरण

फुलपाखरांमधील सर्वांत सामान्य आणि प्रभावी संरक्षण म्हणजे 'छद्मवेष.' या पद्धतीत फुलपाखराचा कोष, अळी किंवा प्रौढ फुलपाखरू आजूबाजूच्या परिसराशी इतकं मिळतंजुळतं दिसतं की, ते ओळखणंच कठीण होतं.


सुकलेल्या फांदीप्रमाणे दिसणारा कोष


इव्हनिंग ब्राउन

हुबेहूब सुकलेल्या पानासारखे दिसणारे '*ब्ल्यू ओक लीफ*' फुलपाखरू तुम्हाला माहीत आहे का? *इव्हनिंग ब्राउन* फुलपाखरू (*फोटोमध्ये* दिसणारे) कायम जमिनीवर पडलेल्या सुक्या पानांमध्ये वावरते. त्यामुळे त्याचे रंगरूप आणि पंखांची नक्षी सुक्या पानांशी मिळतीजुळती असते.

'*कॉमन बॅरन*' या फुलपाखराची अळी आंब्याची पानं खाते आणि त्यावरच राहते. अळीचा रंग व आकार पानाच्या शिरांसारखाच असल्यामुळे ती सहज लक्षात येत नाही. खाऊन झाल्यावर ही अळी पानाच्या मुख्य शिरेवर अगदी न हलता विसावलेली असते आणि आंब्याच्या पानामध्ये अक्षरशः मिसळून जाते.

## 'विषारी' फुलपाखरू

जेव्हा लपणं शक्य नसतं, तेव्हा काही फुलपाखरं आपला भडक रंग दाखवून 'विषारी' असल्याचा इशारा देतात. निसर्गात अनेक प्राणी विषारी असतात आणि शिकारी प्राणी अशा जीवांपासून दूर राहायला शिकलेले असतात.

**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी**
**jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा**
**किंवा**
**वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा!**
**आणि घरपोच अंक मिळवा.**

प्रासंगिक




# 'मराठी' आज्जीची गोष्ट...

– अक्षय वाटवे

सगळ्या मुलांना दिवाळीची सुट्टी लागली होती. त्यामुळे एकदम मजा, मस्तीचं वातावरण होतं. *सोसायटीच्या* छोट्या पटांगणावर सकाळ-संध्याकाळ मुलांची धमाल चालली होती. रमा आणि अतुल दोघं शेजारी-शेजारी राहायचे तर रीना आणि यश समोरच्या इमारतीत. या चौघांची दोस्ती एकदम पक्की होती. चौघे एकदम धाडसी. आणि त्यांचे पालकही योग्य ती काळजी घेऊन, त्यांना चांगलं प्रोत्साहन द्यायचे.

...तर संध्याकाळी *सोसायटीतल्या* नेहमीच्या जागी भेटल्यावर मुलांचा *प्लॅन* ठरला. बेत पक्का करून चौघं आपल्या घरात पळाले.

त्यांच्या *सोसायटीपासून* जवळच काही शासकीय इमारती होत्या. आणि अजून दोन-तीन जुन्या इमारती होत्या, त्या सगळ्या फिरून बघायच्या होत्या. या इमारतीत नक्की काय कामकाज चालतं? कसं चालतं? असे किती तरी कुतूहलाचे प्रश्न घेऊन रमा, अतुल, रीना, यश ही चौकडी निघाली.

त्या इमारतींची माहिती मिळवत, तेथील लोकांशी बोलत चौकडी काम समजून घेत होती. चालता-चालता मुलं बरीच लांब आली होती. शहराच्या मुख्य भागापासून थोडी लांब तिथं एक खूप जुनी इमारत होती. तिथं मुलं पोहोचली तेव्हा बराच उशीर झाला होता, काळोखही पडला होता. आणि त्यांना कोणी रडतो आहे, असा बारीक आवाज ऐकू आला.

चौघंही थांबले. आजूबाजूला बघू लागले. आवाज कुठून येतोय कळेना. तेवढ्यात यश म्हणाला, 'बहुतेक इमारतीतून येतोय.' चौघांनी आत जाऊन नक्की प्रकार काय ते बघायचं ठरवलं. कर्रर्ऽऽ असा आवाज करत भलामोठा दरवाजा उघडला गेला. चौघं जण पुढं चालू लागले. प्रवेशद्वारावर थोडासा रंग उडालेला, धूळ चढलेला मोठा नामफलक होता 'सार्वजनिक ग्रंथालय' असं लिहिलेला! आता हुंदक्यांचा आवाज मोठा होत गेला.

रमाने तिच्याजवळ असलेला *टॉर्च* काढला, आणि त्याच्या प्रकाशात ती आजूबाजूला पाहू लागली. मोठमोठी कपाटे आणि कपाटात वेगवेगळ्या विषयांवरची हजारो पुस्तके.

रमा आपल्या मित्रांना म्हणाली,

''अरे हे तर ग्रंथालय आहे, इथं अंधारात कोण रडत असेल?''

रीना आणि अतुल घाबरले होते, ते म्हणाले,

''नको रे, आपण परत जाऊ या. हे काही खरं नाही... भूतबीत असेल तर, मला खूप भीती वाटते...''

तेवढ्यात यश म्हणाला,


''रमा *टॉर्च* दाखव इकडे... इथे काहीतरी आहे...''

आता मात्र रमाचा धीर सुटला ती मोठ्ठ्या आवाजात म्हणाली,

''कोण आहे रे तिकडे!

**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा किंवा वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा! आणि घरपोच अंक मिळवा.**

## वाचलेच पाहिजे असे काही...




**किंमत : ₹ २३० पृष्ठसंख्या : १५२**
**लेखिका : सौ. मानसी योगेश कुलकर्णी**
**प्रकाशक : अनाहत प्रकाशन**

प्रिय मित्रमैत्रिणींनो, तुम्ही आजपर्यंत काही पुस्तकं वाचली असतील. कथा, कादंबरी, काव्यसंग्रह अगदी नाटकंसुद्धा!

तुमच्यापैकी काहींना नाटकात भूमिका करायलाही आवडत असेल, तर काहींनी त्यात पारितोषिकही मिळवली असतील; पण अभ्यासाचं 'नाटक' न करता चक्क 'नाटकातून'च 'अभ्यास' करता आला, तर काय बहार येईल ना?

मुलांनो, याच कल्पनेला वास्तवात आणणारं एक नवीन पुस्तक 'अनाहत प्रकाशन'ने प्रकाशित केलं आहे. त्याचं नावच मुळी आहे, '**अभ्यासनाट्य**' ते लिहिलं आहे, अभिजात एज्युकेशन सोसायटी या प्रशालेत शिकवणाऱ्या एका अनुभवी शिक्षिकेनं; म्हणजे सौ. मानसी योगेश कुलकर्णी यांनी! या पुस्तकात 'अभ्यासनाट्य' स्पर्धेत सलग १२ वर्ष प्रथम क्रमांक मिळालेली १२ नाटकं आहेत.

आता या मागील भूमिका जाणून घेऊ या. 'नाट्यसंस्कार कला अकादमी'चे संस्थापक श्री. प्रकाश पारखी यांच्या कल्पनेतून 'अभ्यासनाट्य' या स्पर्धेला सुरुवात झाली.

यात मराठी आणि इतिहास वगळता इतर विषयामधील किचकट संकल्पना नाट्यरूपात सादर करायच्या होत्या. या निमित्ताने मुलांना नाटकाचा आनंदही घेता येतो आणि अभ्यासही होतो. यात मानसी कुलकर्णी यांनी इयत्ता सहावी विज्ञानातील वनस्पतींचे वर्गीकरण, इयत्ता सहावी विज्ञानातील गती आणि गतीचे प्रकार, गणितावरील कोनाचे प्रकार या विषयांवर नाटके लिहिली. इयत्ता सातवी मधील भूगोलातील सागरतळ रचना, तर दहावीतील हिमालयाच्या रांगा या सगळ्या धड्यांपर्यंत निरनिराळ्या, विषयांमधील वेगवेगळ्या संकल्पनांवर आधारित नाटके अत्यंत रंजकपणे आणि मुलांच्या भाषेत लिहिली आहेत.

प्रसंगानुरूप त्यात गोंधळ, उखाणे, *रॅप साँग,* विनोदाची पखरण, पात्रांची लटकी भांडणे अशा अनेक प्रकाराने खुसखुशीत संवाद येतात. आणि मोठमोठे कंटाळवाणे वाटणारे धडे/पाठ मुलं हसत खेळत शिकतात.

विद्यार्थ्यांच्या विश्वात डोकावून पाहिलं की, बहुतांशी एक गोष्ट दिसते, ती म्हणजे अभ्यास म्हटलं की, कंटाळा आणि नाटक म्हटलं की, उत्साह!

**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी**
**jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा**
**किंवा**
**वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा!**
**आणि घरपोच अंक मिळवा.**

**जाणून घ्या नृत्यप्रकार : रौफ (काश्मीर)** – वसंत ऋतूचे आगमन, कापणीचा हंगाम हा या नृत्याचा उद्‌देश असतो. हे नृत्य पारंपरिक काश्मिरी संगीतावर सादर करतात.

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. सौरभ फाटक, डोंबिवली ➢ श्री. प्रसन्न राखे, छ. संभाजीनगर ➢ श्री. तन्मय बुडुख, पुणे ➢ डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, पुणे ➢ श्रीमती आरती अजित पटवर्धन, पुणे



वारणा सायन्स अँड इनोव्हेशन ॲक्टिव्हीटी सेंटर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील ध्वनीबाबतचे उपकरण – **संगीतमय नळी/ म्युझिकल ट्यूब**

## ध्वनी

दैनंदिन जगण्यात अनेक प्रकारचे आवाज आपल्या कानावर पडतात. आवाजाला शास्त्रीय भाषेत 'ध्वनी' असे संबोधतात.

ध्वनी म्हणजे काय? ध्वनीची निर्मिती, स्थलांतर कसे होते? हे आपण थोडक्यात समजून घेणार आहोत.

- एखाद्या वस्तूच्या हालचालींमुळे निर्माण झालेले तरंग हवेच्या माध्यमातून आपल्या कर्ण पटलावर पडले असता ध्वनीची अनुभूती होते.
- कोणत्याही माध्यमाच्या उपलब्धतेशिवाय ध्वनीचे स्थलांतर होऊ शकत नाही. स्थायू, द्रव आणि वायू अशा प्रत्येक माध्यमांमध्ये ध्वनीचा वेग भिन्न असतो. माध्यमाची घनता, तापमान इ. गोष्टींवर ध्वनीचा वेग अवलंबून असतो.
- ध्वनीची तीव्रता 'डेसिबल' (dB) या एककात मोजतात.
- मनुष्याची श्रवण क्षमता २०Hz ते २०KHz (वारंवारता) असून ०dB ते १२०dB तीव्रतेचा आवाज आपण ऐकू शकतो.
- गाड्यांचे *हॉर्न*, फटाके, हेलिकॉप्टर, विमान इ. ध्वनी स्रोतांमुळे निर्माण होणारा साधारण ७०dB पेक्षा जास्त तीव्रतेचा ध्वनी कर्णकर्कश स्वरूपाचा असून त्याचा परिणाम आपल्या श्रवण यंत्रणेवर होतो व ती कमकुवत अथवा निकामी होऊ शकते.
- चित्रात दाखवलेल्या काळ्या ते पांढऱ्या नळी पाईपवर सळई अथवा हातोडीच्या साहाय्याने आघात केल्यास 'सा' 'रे' 'ग' 'म' 'प' 'ध' 'नि' 'सां' असा भिन्न वारंवारतेचा ध्वनी आपल्या कानावर पडेल.
- नळी/पाइप निर्मितीसाठी वापरला जाणारा धातू आणि माध्यम बदललेले असता मिळणाऱ्या आवाजाची तीव्रता व वारंवारता बदलू शकते.
- सोबतच्या उपकरणामध्ये कमी लांबीच्या नळीतून निर्माण होणाऱ्या आवाजाची वारंवारता ही जास्त लांबीच्या नळीतून निर्माण होणाऱ्या आवाजाच्या वारंवारतेपेक्षा जास्त आहे. यावरून असे लक्षात येते की, नळी/पाईपच्या लांबीनुसार ध्वनी तरंगांना प्रवाहित होण्यासाठी उपलब्ध असणारी पोकळी भिन्न असल्यामुळे निर्माण होणाऱ्या ध्वनीची वारंवारता भिन्न असते.
- याच तत्वाला अनुसरून, बासरी वाजवत असताना बोटांच्या साहाय्याने झाकलेल्या छिद्रांमुळे ध्वनी तरंगांना प्रवाहित होण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या पोकळीच्या भिन्न लांबी प्रमाणे भिन्न वारंवारतेचे स्वर निर्माण होतात.
- तसेच सजीवांच्या (मनुष्य, पशू, पक्ष्यांच्या) स्वरयंत्राचा आकार (लांबी, रुंदी) भिन्न असल्यामुळे निर्माण होणारा ध्वनीही वेगळा असतो.

**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी**
**jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा**
**किंवा**
**वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा!**
**आणि घरपोच अंक मिळवा.**

**जाणून घ्या नृत्यप्रकार : लावणी (महाराष्ट्र)** – पारंपरिक लोकनृत्य आणि संगीत प्रकार आहे, जे लावण्य (सौंदर्य) या शब्दावरून आले आहे; यात ढोलकीच्या तालावर सादर होणारे आकर्षक नृत्य, अभिनय आणि संगीताचे सुंदर मिश्रण असते.

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. अभिजीत पाणदरे, पुणे ➢ श्री. शरद पालकर, पुणे ➢ श्री. अनिल रिसबूड, पुणे
➢ श्रीमती स्नेहलता गणेश गद्रे, पालशेत, ता. गुहागर, जि. रत्नागिरी

# *नवा मेस्सी !*

– डॉ. मेघश्री दळवी

तंत्रज्ञान

*'मेस्सी* म्हणजे जादूगार' हे वाक्य *फुटबॉल* विश्वात नेहमी ऐकू येतं. अलीकडेच भारतभेटीवर येऊन गेलेल्या *मेस्सीच्या* कौशल्यानं अख्खं जग भारावून गेलेलं आहे. *फुटबॉल* त्याच्या पायाला अक्षरश: चिकटल्यासारखा असतो, तो क्षणार्धात *बॉलची* दिशा बदलू शकतो, त्याचा गोल किती सहज असतो, अशा चर्चा सतत रंगत असतात. *'लिओनेल मेस्सी'* म्हणजे *फुटबॉल* विश्वातला एक अभूतपूर्व तारा आहे यात शंकाच नाही.

*मेस्सीसारखा* दुसरा कोणी होणार नाही, असं आपण नेहमी ऐकतो. मग त्याला तुल्यबळ प्रतिस्पर्धी अस्तित्वात आहे असं म्हटलं, तर ते खरं वाटेल का? पण गेल्या काही वर्षांमध्ये तंत्रज्ञानानं खरोखरच अशी मजल मारली आहे. त्यातूनच *मेस्सीला* टक्कर देणारा एक प्रतिस्पर्धी उदयाला आला आहे. फक्त एवढंच की, तो माणूस नसून माणसासारखा दिसणारा *'आर्टेमिस'* नावाचा *'ह्युमनॉइड रोबोट'* आहे.

कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या अभियंत्यांनी अनेक वर्षांच्या परिश्रमानं *'आर्टेमिस'* तयार केला आहे. त्याचं पूर्ण नाव आहे ***'अॅडव्हान्स्ड रोबोटिक टेक्नॉलॉजी फॉर एनहान्स्ड मोबिलिटी अँड इम्प्रूव्हड स्टॅबिलिटी.'*** या भल्यामोठ्या नावाचा *शॉर्टफॉर्म* आहे *'आर्टेमिस.'* गंमत म्हणजे ग्रीक पुराणामध्ये *'आर्टेमिस देवी'* वेग आणि चापल्यासाठी प्रसिद्ध आहे. तो अर्थही या *ह्युमनॉइडला* चपखलपणे लागू पडतो.

*आर्टेमिसची* उंची चार फूट-आठ इंच आणि वजन सुमारे चाळीस किलो आहे. त्याची बांधणी मानवी शरीर रचनेवर आधारित आहे. स्नायू, सांधे, आणि तोल राखण्याच्या मानवी पद्धतींचा अभ्यास करून त्याची रचना करण्यात आली आहे. त्यामुळे तो सेकंदाला सुमारे २.१ मीटर वेगानं चालू शकतो. या वेगानं तो जगातील सर्वांत वेगवान *'ह्युमनॉइड रोबोट्स'च्या* पंक्तीत जाऊन बसला आहे. *'एनहान्स्ड मोबिलिटी'* अर्थात हालचालीची वाढीव क्षमता इथं दिसते.

*आर्टेमिसमध्ये* अनेक संवेदक *(सेन्सर्स)* आणि स्नायूंचं काम करणारे कार्यान्वयक *(अॅक्च्युएटर्स)* आहेत. जमिनीचा उतार, पृष्ठभागाची रचना, शरीर किती झुकलं आहे, याची माहिती संवेदक सतत गोळा करतात. *आर्टेमिसकडे* प्रगत *कॉम्प्युटर व्हिजन सिस्टिम* आहे. एखाद्या कसलेल्या खेळाडूप्रमाणं तो मैदानाचा अंदाज घेतो. समोरचा खेळाडू किती अंतरावर आहे, *गोलपोस्टची* अचूक दिशा कोणती, याचं मोजमाप ही *व्हिजन सिस्टिम* क्षणार्धात करते.




**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी**
**jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा**
**किंवा**
**वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा!**
**आणि घरपोच अंक मिळवा.**

प्रेरणादायी

# 'कुमार' साहित्य संमेलन २०२६!

– मकरंद जोशी

या वर्षाच्या सुरुवातीला एका अनोख्या, ऊर्जादायी आणि उत्फुल्ल संमेलनात सहभागी होण्याची संधी मिळाली. हे संमेलन पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी–छात्र प्रबोधनतर्फे दरवर्षी आयोजित केलं जातं. शालेय विद्यार्थ्यांसाठी असलेलं हे संमेलन 'कुमार साहित्य संमेलन' म्हणून ओळखलं जातं. आणि या संमेलनाचे सगळे कार्यक्रम–प्रमुख अतिथींच्या भाषणापासून ते संमेलनातील व्याख्यानांपर्यंत सगळे कार्यक्रम इ. ७ वी ते १० वी मधील कुमार वयाच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना केंद्रस्थानी ठेवून आखले जातात.

या वर्षी दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी ज्ञान प्रबोधिनी–छात्र प्रबोधन, पुणे नगर वाचन मंदिर, भोर एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने राजा रघुनाथराव विद्यालय, भोर येथे विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कुमार संमेलन आयोजित करण्यात आलं होतं. ज्येष्ठ लेखिका मंगला गोडबोले या संमेलनाच्या प्रमुख अतिथी होत्या. आपल्या आटोपशीर भाषणात त्यांनी संमेलनात सहभागी झालेल्या इ. ८ वी, इ. ९ वीतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या वयातल्या अर्थात पौगंडावस्थेतील मुला–मुलींची मानसिक–भावनिक आंदोलने काय असतात? या वयात होणारी मानसिक जडणघडण का महत्त्वाची असते आणि याच वयात पुस्तकांशी 'गट्टी' जमली, तर वाचनाचा छंद कसा जडू शकतो, तो जडणं का आवश्यक असतं, उत्तम वाचकांमधूनच चांगला लेखक कसा निर्माण होतो, हे सगळं अगदी सहजस्वरात, उपदेशाचा सूर न लावता सांगितलं. त्यामुळे ते 'भाषण' न होता एका ज्येष्ठ, अनुभवी, संवेदनशील लेखिकेनं शाळकरी मुलांशी साधलेला मनमोकळा संवाद ठरला.


संमेलनात सहभागी प्रमुख अतिथी–लेखक

या कुमार साहित्य संमेलनामध्ये लेखिका नीलिमा गुंडी, संगीता बर्वे, चित्रलेखा पुरंदरे, आश्लेषा महाजन, संगीता पुराणिक, मृणालिनी कानिटकर, पद्मजा मोरे या ज्येष्ठांसोबत अक्षय वाटवे, क्षितिज देसाई आणि मी (मकरंद जोशी) असे वेगवेगळ्या प्रकारचे लेखन करणारे लेखक एकत्र आलो होतो. प्रवासवर्णन, कविता, कथा, ललित लेख इ. साहित्य प्रकारांचं लेखन, तसंच गद्य–पद्य अभिवाचन कसं करावं याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

तसंच 'लेखक' होण्यासाठी काय करावं लागतं (म्हणजे पूर्वतयारी म्हणून), लिहिताना वाचनाचा उपयोग कसा होतो? लेखकाला विषय कसे सुचतात? याबाबतही मुला–मुलींबरोबर गप्पा मारल्या. शिवाय आमच्यातील काही जणांचे साहित्य पाठ्यपुस्तकात समाविष्ट आहे, त्यामुळे पाठ्यपुस्तकातील लेखक म्हणूनही मुलांशी संवाद साधला. वेळ थोडा होता; पण मुलांचा उत्साह अपार होता.

**हा लेख पूर्ण वाचण्यासाठी**
**jpprakashane.org वरून मासिक खरेदी करा**
**किंवा**
**वार्षिक वर्गणी भरून सभासद व्हा!**
**आणि घरपोच अंक मिळवा.**

**जाणून घ्या नृत्यप्रकार : सत्रीय (आसाम)** – या नृत्याची सुरुवात १५ व्या शतकात महापुरुष श्रीमंत शंकरदेव यांनी वैष्णव धर्माचा प्रसार करण्यासाठी केली. आणि त्याला २००० मध्ये 'संगीत नाटक अकादमी' ने शास्त्रीय नृत्याचा दर्जा दिला.

वार्षिक देणगीदार – ➢ श्री. संकेत वारुडकर, धुळे ➢ सौ. प्रियतमा सिसोदिया, धुळे ➢ श्री. तुषार फुले, छ. संभाजीनगर ➢ श्री. गिरीश पळसकर, बंगळुरू, कर्नाटक

## ज्ञान प्रबोधिनी – छात्र प्रबोधनतर्फे 'जोडीकार्य स्पर्धा – २'

**सौर माघ शके १९४७/ फेब्रुवारी २०२६**

**जोडीकार्य करा – अनुभवसमृद्ध व्हा! बक्षीस मिळवण्याची प्रत्येकाला संधी!**

**या महिन्यासाठी जोडीने करायचे कार्य – चला स्वच्छता करू या!**

**दि. २३ फेब्रुवारी म्हणजे संत गाडगे महाराजांची जयंती! संत गाडगे महाराजांनी 'स्वच्छता' याविषयी जनजागरण करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले.**

**त्यांचे स्मरण ठेवून २ दिवस २ तास सकाळी/संध्याकाळी आपल्या जवळच्या बागेत जाऊन घनकचरा, प्लॅस्टिक, कागद इ. गोळा करून बागेची स्वच्छता करा. तसेच साफ-सफाई करताना, स्वच्छता कर्मचाऱ्यांशी संवाद साधतानाची एकूण ५ प्रकाशचित्रे 'जोडीकार्य स्पर्धा २' असे लिहून** chhatra.spardha@jnanaprabodhini.org **या मेल आयडीवर पाठवा.**

या विषयीचे अधिक तपशील, नियम व बक्षिसांची योजना सोबतच्या क्यू आर कोडमध्ये दिली आहे. ते वाचा आणि लागा कामाला! जोडी अशी निवडा की, किमान ३ कामांसाठी तरी तीच जोडी असेल.

**जोडीकार्य तपशील**

**सर्व बक्षिसांचे वितरण जानेवारी २०२७ मध्ये होईल.**

## जाहिरात निर्मिती कल्पक स्पर्धा –१२ निर्णय

**विद्यावर्धिनी विद्यालय, अहमदपूर या शाळेमधील ७ गुणवत्तापूर्ण जाहिरात निर्मिती करणाऱ्या खालील विद्यार्थ्यांना बक्षीस (पुस्तकरूपाने) पाठवण्यात येईल. छात्र प्रबोधनतर्फे सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक!**

१) अंजली पवार  २) आरूषी गंगथडे  ३) आज्ञा केंद्रे  ४) अवनी वलसेकर
५) अन्वी पाटील  ६) रूद्राक्ष भगनूरे  ७) सृष्टी लोलेवार

**सर्व विद्यार्थी (इ. ७ वी)**

## ✻✻ प्रतिसादी वाचकवीर स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे अभिनंदन! ✻✻

खालील विद्यार्थ्यांनी (सौर पौष शके १९४७, वर्ष २६ अंक ४) हा अंक बारकाईने वाचत, अंकातील साहित्याचा आनंद घेत, अंकातील प्रश्नांची उत्तरे 'छात्र प्रबोधन'कडे पाठवली आहेत. त्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक! त्यातील गुणवत्तापूर्ण उत्तरे लिहिलेल्या खालील विद्यार्थ्यांना बक्षीस (पुस्तकरूपाने) लवकरच पाठवण्यात येईल.

**१)** कु. पियुषा फरांदे, (इ. ७ वी)  **२)** कु. संयोगिता जाधव, (इ. ६ वी)  **३)** चि. राधविक फरांदे, (इ. ७ वी)

**सर्व विद्यार्थी द्रविड हायस्कूल, वाई**

## प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष २६/५)

**अंक बारकाईने वाचत व अंकातील साहित्याचा आनंद घेत दि. २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अंकातील प्रश्नांची उत्तरे** लिहून छात्र प्रबोधनकडे पाठवा... बक्षीस मिळवण्याची प्रत्येकाला संधी!

१. 'धुंधुरमास' साजरा करण्याची पद्धत ऋतुचक्राशी कशी जोडली गेली आहे. (संदर्भ – एकांकिका : मिले सूर मेरा तुम्हारा)
२. 'मराठी' आज्जीचा त्रास कमी करण्यासाठी मित्रांच्या चौकडीने कोणते संकल्प केले? (संदर्भ–'मराठी' आज्जीची गोष्ट...)
३. निसर्गाने फुलपाखरांच्या संरक्षणासाठीची योजना कशी केली आहे?(संदर्भ–फुलपाखरांमधील संरक्षणासाठीचे अनकूलन!)
४. 'मेस्सी'ला टक्कर देऊ शकणाऱ्या रोबोटचे नाव काय? त्याची कोणती वैशिष्ट्ये आहेत? (संदर्भ : नवा मेस्सी!)
५. मराठी भाषा गौरव दिन (२७ फेब्रु.), राष्ट्रीय विज्ञान दिन (२८ फेब्रु.) तुम्ही कल्पकतेने कसे साजरे केलेत? तुम्ही साजऱ्या केलेल्या कोणत्याही एका दिनविशेषाविषयी सुमारे ८०–१०० शब्दांत पाठवा.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १२ माघ, शके १९४७, १ फेब्रुवारी, २०२६ या दिवशी प्रकाश ऑफसेट, ८२, पर्वती टॉवर्स, पुणे – ९ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.
This magazine is owned by Jnana Prabodhini and is printed by Printer, Publisher and Editor Shri. Mahendra Sethiya, on Rashtriya Sour 12 Magha Sake 1947/1st February 2026, printed at Prakash Offset, 82, Parvati Towers, Pune - 9 and published at Jnana Prabodhini, 510 Sadashiv Peth, Pune 30

# सौर पौष/जानेवारी महिन्यातील भोर येथील कुमार साहित्य संमेलन!!




अध्यक्षीय भाषण करताना



कार्यशाळा घेताना कवयित्री संगीता बर्वे



कार्यशाळा घेताना लेखिका नीलिमा गुंडी



पुस्तक प्रदर्शन बघताना मान्यवर



कार्यशाळा घेताना लेखक अक्षय वाटवे



कल्पक स्पर्धांचा आनंद घेताना मुले

सविस्तर तपशील पान क्र. २४ वर वाचा

## छात्र प्रबोधनतर्फे सौर माघ/फेब्रुवारी महिन्यातील उपक्रमात सहभागी व्हा!

### एक दिवसीय कुमार साहित्य संमेलन, अहमदपूर, जि. लातूर

**दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी छात्र प्रबोधन आणि विद्यावर्धिनी विद्यालय, अहमदपूर, जि. लातूर** यांच्या संयुक्त विद्यमाने

**कुमारांसाठी एक दिवसीय साहित्य संमेलनाचे विद्यावर्धिनी विद्यालयात आयोजन!**

अहमदपूर, लातूर परिसरातील 'छात्र प्रबोधन'च्या सभासदांनी अवश्य सहभागी व्हावे. तुमच्या शाळेत असे कुमार साहित्य संमेलन आयोजित करायचे असल्यास अवश्य संपर्क करावा. **व्हॉटस्‌ॲप क्रमांक – ९८८१४०९७५४**

### दरमहा दूरस्थपणे लेखक गप्पा

या महिन्यात शनिवार, **दि. १४ फेब्रुवारी २०२६** रोजी लेखक **'क्षितिज देसाई'** यांच्याशी दूरस्थ गप्पांत सहभागी होण्यासाठी सोबतच्या क्यू आर कोडद्वारे व्हॉटस्‌ॲप गटात सहभागी व्हा!

**शाळाही सहभागी होऊ शकतील!**

**सौर माघ, शके १९४७/फेब्रुवारी २०२६ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan**
**प्रकाशन दिनांक : सौर १२ माघ, शके १९४७/१ फेब्रुवारी २०२६**
**पंजीकरण क्रमांक** (RNI NO.) MAHMAR /2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (SDM/Pune/SR/139/2017)

# कुमारांच्या कलाकृतीतून...



**चि. आशुतोष पांडुरंग गोरे, इ. ७ वी** (जनकल्याण निवासी विद्यालय, हरंगुळ, जि लातूर)

**सौर दिनदर्शिका शके १९४७**

| | सौर माघ फाल्गुन | फेब्रुवारी २०२६ |
|---|---|---|
| र. | मा.१२ | 1 |
| सो. | १३ | 2 |
| मं. | १४ | 3 |
| बु. | १५ | 4 |
| गु. | १६ | 5 |
| शु. | १७ | 6 |
| श. | १८ | 7 |
| र. | १९ | 8 |
| सो. | २० | 9 |
| मं. | २१ | 10 |
| बु. | २२ | 11 |
| गु. | २३ | 12 |
| शु. | २४ | 13 |
| श. | २५ | 14 |
| र. | २६ | 15 |
| सो. | २७ | 16 |
| मं. | २८ | 17 |
| बु. | २९ | 18 |
| गु. | ३० | 19 |
| शु. | फा. १ | 20 |
| श. | २ | 21 |
| र. | ३ | 22 |
| सो. | ४ | 23 |
| मं. | ५ | 24 |
| बु. | ६ | 25 |
| गु. | ७ | 26 |
| शु. | ८ | 27 |
| श. | ९ | 28 |

**सभासदांनी वर्गणी भरताना आपला व्हॉटस्ॲप संपर्क क्रमांक नोंदवणे आवश्यक आहे, तसे केले नसल्यास ९०११९६१४४५ या भ्रमणभाषवर संपर्क क्रमांक लवकरात लवकर कळवावा. म्हणजे सभासदांशी वेळोवेळी संपर्क साधता येईल. स्पर्धा, उपक्रम, व्याख्याने, नवीन प्रकाशने यांची माहिती पोहोचवता येईल.**

**सौर ➤ दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.**

छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित दिनदर्शिकेतील फेब्रुवारी महिन्याचे पान, त्यातील प्रार्थना ऐका अभंग म्हणा, खेळ खेळा व आपल्या मित्र-मैत्रिणींना शिकवा, त्यातील समूहगायन व इतर स्पर्धांना प्रतिसाद द्या.

**संपर्क पत्ता :**
**छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी**
**५१० सदाशिव पेठ, पुणे** 411030
☎ **(020) 24207 174/175**
www.chhatraprabodhan.org
**इ-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**वार्षिक वर्गणी : ₹ ४००** (दिवाळी अंकासह),
+ स्पीडपोस्ट/कुरिअरने अंक पाठविण्यासाठी अतिरिक्त खर्च ₹ ३००
ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी व पुस्तक खरेदीसाठी :
**www.jpprakashane.org**

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे, ही आग्रहाची, प्रेमळ विनंती.

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन